## <u>नियमित दिवाणी दावा क्र. २०४/२०२५ मधील</u>
## <u>निशाणी क्र. ५ खालील आदेश</u>

प्रस्तुतचा अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ च्या **आदेश ३९ नियम १ व २** अन्वये तुर्तातुर्त मनाई हुकुम मिळण्याकरिता दाखल केलेला आहे.

२. <u>**अर्जातील संक्षिप्त हकीकत येणेप्रमाणे**</u> —

वादीने प्रस्तुतचा दावा हा ठरावासाठी व निरंतर ताकिदीच्या मनाई हुकूम मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. मौजे दहिवड, ता.देवळा, जि. नाशिक येथील वादीच्या मालकीची शेतजमिन गट नं.१०५७ यांसी क्षेत्र ००हे. ९७ आर यापैकी वादीचे स्वतंत्र क्षेत्र ००हे. ७० आर व वादीच्या पतीचे अशोक शिवाजी देवरे यांचे क्षेत्र ००हे. २७ आर ही मिळकत आहे. (त्यास यापुढे 'दावा मिळकत' असे संबोधण्यात आलेले आहे.) सदर दावा मिळकत वादी व तिच्या पतीच्या नावावर असुन प्रत्यक्ष कब्जेवहिवाट व पिकपेरा वादीचा आहे. वादीचा विवाह अशोक देवरे यांच्याशी दि.०७.०५.२००८ रोजी गंधर्व पध्दतीने झालेला आहे. मुलबाळ झालेले नाही. वादीचे पती दि.०४.१२. २०२४ रोजी मयत झालेले आहेत. त्यांना वादी ही एकमेव कायदेशीर वारस आहे. वादीच्या पतींचा पुर्वी निर्मला हिच्याशी विवाह झाला होता. ती दि.१८. ०५.२००७ रोजी निधन पावलेली आहे. वादीचे पती अशोक यांना दत्तु व बाळु असे दोन भाउ आहेत. वादीचे पती यांच्याशी वादीचा विवाह झाल्यानंतर तिचे नाव निर्मला उर्फ निर्मलाबाई असे ठेवण्यात आले. वादीचे पती हयात असतांना त्यांनी विवाहानंतर वादीच्या नावे गट नं.१०५७ मधील ७० आर क्षेत्रास नाव दाखल करणेकामी कायदेशीर पुर्तता करून वाटपाने वादीचे नाव उतारासदरी दाखल केले. त्यानुसार दि.२८.०८.२०१३ रोजी नोंद नं.२८५६ पारीत झालेली असुन त्यानुसार वादीच्या नावे ७० आर क्षेत्र व वादीच्या पतीच्या नावे उर्वरीत २७ आर क्षेत्र दाखल झालेले आहे. ती नावे आजरोजी देखील कायम आहेत.

३. वादीचे पुढे असे कथन आहे की, वादी व तिचे पती विवाहानंतर अखंडितपणे एकत्र राहत होते. वादीचे पती मृत्युपावेतो त्यांचा सर्व सांभाळ वादीनेच केला होता. त्यांच्या मृत्युनंतर उत्तरकार्य वादीने केलेले होते. वादीने प्रतिवादी नं. १ यांचा मुलगा गणेश यास दि. २९.११.२०२४ रोजी रक्कम रू. १,००,०००/— तसेच दि. ०३.१२.२०२४ रोजी रक्कम रू. १,५०,०००/— बॅकेतुन काढुन रोख स्वरूपात दिलेले आहेत. तसेच सुमारे १ वर्षापुर्वी वादीने प्रतिवादी नं.२ यास रक्कम रू. ५०,०००/— बॅकेतुन काढुन रोख स्वरूपात दिलेले आहेत. वादीने प्रतिवादींना वेळोवेळी आर्थिक व इतर मदत केलेली आहे. वादीने दि.२३.०५.२०२५ रोजी गट नं.१०५७ या मिळकतीच्या उतारासदरी तिचे नाव दाखल होणेकामी अर्ज दिला होता. सदर गोष्ट माहित असतांना देखील प्रतिवादी यांनी कळवण येथील न्यायालयात ते वादीचे पती व त्यांची पहिली पत्नी निर्मला यांचे वारस असल्याबाबत दिवाणी चौकशी अर्ज नं.६/२५ दाखल केला. त्याबाबत वादीस कोणतीही माहिती होवु दिली नाही. त्यांनी न्यायालयाची फसवणुक करून दि.२३.०६.२०२५ रोजी कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळविलेले आहे. त्याची माहिती वादीला दि.२९.०७.२०२५ रोजी झालेली होती. प्रतिवादींनी सदर निकालाचा दुरूपयोग करून त्यांचे नाव मिळकतीस दाखल होणेकामी अर्ज केला. वादी तलाठी साहेब यांना भेटली असता प्रतिवादींनी कोर्टाच्या निकालानुसार त्यांचे वारस या नात्याने नाव दाखल होणेकामी अर्ज दाखल केल्याचे वादीला समजले. त्यावेळी वादीला प्रचंड मानसिक धक्का बसला.

४. वादीचे पुढे असे कथन आहे की, वादीने प्रतिवादी यांची भेट घ ेवुन कोर्टाचा निकाल व दावा मिळकतीच्या अर्जाबाबत विचारणा केली. त्यावेळी वादीने प्रतिवादी व त्यांच्या मुलांना दिलेल्या रक्कमेची मागणी केली असता त्यांनी वादीला दमदाटी, शिवीगाळ करून तिचा मिळकतीवरील कब्जा काढुन घेण्याची धमकी दिली. त्यांनी तिला सदर दावा मिळकतीमधुन बेदखल करणार आहे असे देखील सांगितले. प्रतिवादी व त्यांची मुले हे वादीची दावा मिळकत हडप करण्याच्या प्रयत्नात आहेत. वादीने दावा मिळकतीवर विहीर व

बोरवेलची पाण्याची सुविधा करून मिळकत बागायती केलेली असुन त्यावर घर बांधलेले आहे. तिने दावा मिळकतीमध्ये डाळींबाचे पिक लावलेले असुन उर्वरित क्षेत्रामध्ये मक्याचे पिक पेरलेले आहे. तिचा दावा मिळकतीवर अखंडीतपणे कब्जा आहे. वादीने दि.०१.०८.२०२५ रोजी मंडल अधिकारी व तहसिलदार यांच्याकडे दावा मिळकतीवर प्रतिवादी यांचे नावे लावु नये याकरिता अर्ज दिला होता. त्यावेळी त्यांनी न्यायालयामार्फत आदेश घेवुन येण्यास वादीला सांगितले. वादीस तिच्या मालकीच्या दावा मिळकत व घरातुन बेदखल केल्यास ती भुमीहीन होईल व तिची राहण्याची गैरसोय होईल. वादी दावा मिळकतीमधुन येणा—या उत्पन्नातुन जीवन जगत आहे. तिला उत्पन्नाचे दुसरे कोणतेही साधन नाही. त्यामुळे तिने प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

**५.** प्रतिवादी नं.१ व २ यांनी निशाणी ५ च्या अर्जास जबाब निशाणी १२ अन्वये दाखल केलेला आहे. त्यांनी दाव्यातील सर्व कथने त्यांना मान्य व कबुल नसल्याचे कथन केलेले आहे. त्यांचे असे कथन आहे की, त्यांचे भाउ अशोक यांचा विवाह पहिली पत्नी राजुबाई हिच्याशी झाला होता. त्यातुन त्यांना काहीएक अपत्य झाले नाही. सन १९९१ साली त्यांची कायदेशीर फारकत होवुन ते विभक्त झाले. त्यानंतर त्यांनी निर्मला हिच्याशी दि. १५.०६. १९९१ रोजी कायदेशीर विवाह केला होता. त्यातुन देखील त्यांना अपत्य झालेले नाही. कै. अशोक देवरे व त्यांची पत्नी निर्मला देवरे हे त्यांची वडिलोपार्जित मिळकत नं.१०५७ मधील संपुर्ण क्षेत्र कसुन उत्पन्न घेवुन उदरनिर्वाह करित होते. दि. १८.०५.२००७ रोजी कै. निर्मला अशोक देवरे हिचे निधन झालेले आहे. त्यांची मृत्यु नोंद करण्यात आलेली आहे. त्यानंतर कै. अशोक देवरे यांनी कोणाशीही विवाह केला नाही. त्यांच्या पश्चात प्रतिवादी हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. कै. निर्मला यांच्या निधनानंतर कै. अशोक देवरे हे प्रतिवादी यांच्याकडेच राहत होते व त्यांचे सर्व पालनपोषण व इतर खर्च हे प्रतिवादीच करत होते. तेव्हापासुन कै. अशोक देवरे यांची गट नं.१०५७ ही मिळकत प्रतिवादी कसत होते व आजरोजी देखील ती त्यांच्या

कब्जेवहिवाटीत आहे. तसे असतांना देखील वादीने स्वत:चे नाव निर्मला उर्फ निर्मलाबाई अशोक देवरे असे दाखवुन व तसे बनावट कागदपत्रे तयार करून कै. अशोक देवरे यांची ती कायदेशीर पत्नी असल्याचे भासवुन गट नं.१०५७ मधील क्षेत्र ००हे. ७० आर बेकायदेशीररित्या तिच्या नावावर करून घेतलेले आहे. कै. अशोक देवरे यांचे निधन झाल्यानंतर त्यांचे कायदेशीर वारस असल्याचे दाखवुन तिने नाव लावण्याचा अर्ज दाखल केला व त्यावेळी प्रतिवादी यांना सदर गोष्टीची माहिती झाली. परंतु कै. अशोक देवरे व वादी यांच्यात कधीही वाटप झाले नव्हते. त्यामुळे वादीचा सदर दावा मिळकतीवर कधीही कब्जा नव्हता व नाही.

**६.** प्रतिवादींचे पुढे असे कथन आहे की, वादीने प्रस्तुतचा खोटा दावा दाखल केलेला आहे. त्याआधी प्रतिवादी यांनी ते कै. अशोक देवरे व कै. निर्मला अशोक देवरे यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत वारस दाखला घ ेतलेला आहे. त्यावेळी वादीने हरकत व आक्षेप घेतलेला नाही. त्यामुळे वादी कधीही कै.अशोक देवरे यांची कायदेशीर पत्नी नव्हती व नाही. वादीचे मुळ नाव मंदाकिनी जगन्नाथ पाचोरकर असे असुन तिचा विवाह बाळासाहेब शिंदे यांच्याशी झाला होता. तशी वादीच्या नावाची नोंद फेरफार नोंद नं. १२२८५ अन्वये गट नं.६६३ व ८०२ च्या ७/१२ उतारासदरी झालेली आहे. सदरच्या नोंदी सन २०२२ मधील आहेत. त्यामुळे तोपर्यंत वादीचा विवाह बाळासाहेब शिंदेसोबत अस्तित्वात असल्याचे दिसुन येते. वादीचा विवाह दुसरी अन्य व्यक्ती भोरू भावनाथ यांच्याशी देखील झाल्याचे तिच्या आधार कार्ड व मतदान कार्डावरून दिसुन येते. त्यानुसार तिचा विवाह भोरू भावनाथ यांच्याशी अस्तित्वात असल्याचे दिसुन येते. तरीदेखील वादी ही कै. अशोक देवरे यांची पत्नी असल्याचे खोटे दाखवुन दावा मिळकत हडप करून तबदील करण्याचे पाहत आहे. ती कै.अशोक देवरे यांचे कायदेशीर पत्नी नाही. त्यामुळे वादीचा अर्ज नामंजुर करण्यात यावा अशी त्यांनी मागणी केलेली आहे.

**७.** अर्ज, त्यातील कथनांनुसार व लेखी जबाबानुसार खालील मुद्दे माझे समर्थनार्थ उपस्थित होतात. त्यावरील निष्कर्ष मी कारणमिमांसेसह येणेप्रमाणे देत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | | **निष्कर्ष** |
|---|---|---|---|
| १. | वादीने तिची प्रथमदर्शनी केस सिध्द केली आहे काय? | ... | **होय** |
| २. | अनुकुलतेचा कल वादीच्या बाजुने झुकतो का? | ... | **होय** |
| ३. | अंतरिम मनाई हुकूम मिळाला नाही तर अपरिमित नुकसान होईल ही बाब वादीने सिध्द केली आहे काय? | ... | **होय** |
| ४. | वादी ही तिच्या मागणीप्रमाणे अंतरिम मनाई आदेश मिळण्यास पात्र आहे काय? | ... | **होय** |
| ५. | अंतिम आदेश काय? | ... | **अर्ज खर्चासह मंजूर करण्यात येतो.** |

## कारणमिमांसा

**८.** वादीच्या व प्रतिवादींच्या विधिज्ञांचा मौखिक युक्तिवाद ऐकण्यात आला. अभिलेखावरील कागदपत्रे वाचण्यात आले.

## मुद्दा क्र. १ करिताः

**९.** अंतरिम मनाई हुकूम मिळण्याकरिता वादीने आपली प्रथमदर्शनी बाजु, अनुकुलतेचा कल व अपरिमित नुकसान या तीन पुर्ववर्ती शर्ती न्यायालयात सिध्द करणे आवश्यक आहे.

**१०.** वादीने प्रस्तुतचा दावा ठरावासाठी व निरंतर ताकिदीच्या मागणीसाठी दाखल केलेला आहे. वादीच्या कथनानुसार वादीचे पती अशोक यांचा पहिला विवाह निर्मला यांच्याशी झाला होता. त्यांची प्रथम पत्नी निर्मलाचे दि.१८.०५.२००७ रोजी निधन झालेले आहे. ती मयत झाल्यानंतर अशोक यांनी वादीसोबत दि.०७.०५.२००८ रोजी गंधर्व पध्दतीने विवाह केला.

याउलट प्रतिवादींचे असे कथन आहे की, कै. अशोक देवरे यांनी प्रथम पत्नीचे निधन झाल्यानंतर कुणाशीही विवाह केलेला नाही. वादीने तिच्या कथनांच्या पृष्ठयर्थ अभिलेखावर वादी व कै. अशोक देवरे यांच्या विवाहाचे फोटो दाखल केलेले आहेत. वादीने अभिलेखावर श्री.नानाजी सौद्रा आहेर व श्री.प्रकाश शिवाजी तिडके यांचे देखील प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. सदर फोटोंचे अवलोकन केले असता त्यामध्ये वादी व कै. अशोक देवरे हजर असल्याचे दिसुन येते. सदर प्रतिज्ञापत्रांचे अवलोकन केले असता त्यामध्ये दोन्ही साक्षीदार हे वादीचा विवाह कै.अशोक देवरे यांच्याशी दि. ७.५.२००८ रोजी झाला त्यावेळी उपस्थित होते असे त्यांनी कथन केलेले आहे. त्यामुळे वादी व कै. अशोक देवरे यांचा विवाह दि.०७.०५.२००८ रोजी झाल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते.

**११.** वादीने अभिलेखावर निशाणी ३/४ सोबत तिच्या आधारकार्डची व पॅन कार्डची झेरॉक्स प्रत दाखल केलेली आहे. त्याचे अवलोकन केले असता तिचे नाव त्यावर निर्मलाबाई अशोक देवरे असे स्पष्ट नमुद करण्यात आलेले आहे. वादीने पुढे निशाणी ३/५ सोबत तिचे व पतीचे एसबीआय बॅकेत एकत्रित खाते असल्याबाबतचे पासबुकची झेरॉक्स दाखल केलेली आहे. त्याचे अवलोकन केले असता त्यामध्ये वादीचे व तिचे पती कै. अशोक देवरे यांच्या नावाने संयुक्तीक खाते उघडण्यात आल्याचे दिसुन येते. वादीने अभिलेखावर तिचे स्वतःचे एनडीसीसी व एसबीआय बॅकेचे पासबुक दाखल केलेले आहे. त्यामुळे या सर्व दस्तांवरून देखील वादीचे कै. अशोक देवरे यांच्यासोबत लग्न झाल्याच्या कथनांना पुष्टी मिळतांना दिसुन येते.

**१२.** वादीचे असे कथन आहे की, तिचे पती हयात असतांना त्यांनी गट नं.१०५७ मधील ७० आर क्षेत्र नाव दाखल कामी आवश्यक ती कायदेशीर पुर्तता करून वाटपाने वादीच्या नावाने सदर उतारा दाखल केलेला आहे. त्यानुसार दि.२६.०८.२०१३ रोजी नोंद नं. २८५६ पारीत झालेली असुन ७० आर क्षेत्रास व उर्वरीत २७ आर क्षेत्रास वादीच्या पतीचे नाव दाखल झालेले

आहे. प्रतिवादींचे असे कथन आहे की, कै. अशोक देवरे यांची वादी हिने कायदेशीर पत्नी असल्याची भासून व त्यांच्या वृध्दत्वाचा गैरफायदा घेवुन बेकायदेशीरपणे मिळकत नं.१०५७ मधील ७० आर क्षेत्रास महसुल अधिकारी यांच्याशी संगणमत करून नाव लावून घेतलेले आहे. प्रतिवादींचे पुढे असे कथन आहे की, त्यांना सदर गोष्ट कै. अशोक देवरे यांचे डिसेंबर २०२४ मध्ये निधन झाल्यानंतर सदर गोष्ट निदर्शनास आली. वादीने अभिलेखावर निशाणी ३/२ सोबत फेरफार नोंद नं.२८५६ दाखल केलेली आहे. त्याचे अवलोकन केले असता त्यामध्ये कै. अशोक देवरे यांनी त्यांची पत्नी वादी हिच्या नावाने गट नं.१०५७ मधील ७० आर क्षेत्र वाटपाने तिला दिल्याचे दिसुन येते. त्यानुसार वादी व कै. अशोक शिवाजी देवरे यांच्या नावाची नोंद. ७/१२ उता—यावर झाल्याचे दिसुन येते. सदर नोंद वादीने निशाणी ३/१ सोबत दाखल केलेली आहे. याठिकाणी हे नमुद करणे गरजेचे आहे की, प्रतिवादी नं. १ व २ हे वादीचे पती कै.अशोक देवरे यांचे भाउ आहेत. त्यामुळे अशा परिस्थितीत वादी हिने तिचे नाव बेकायदेशीरपणे नोंद नं.२८५६ अन्वये गट नं. १०५७ या मिळकतीला लावून घेतले होते तर त्या परिस्थितीत सदर नोंदीला हरकत घेवुन ७/१२ उता—याला लागलेल्या तिच्या नावाला देखील त्यांनी हरकत घेणे आवश्यक होते. परंतु सदर नोंद झाल्यानंतर देखील प्रतिवादीने त्याला हजर झाल्यानंतर आजपर्यंत आव्हानीत केलेले नाही. प्रतिवादींचे हे कथन की त्यांना कै. अशोक देवरे मयत झाल्यानंतर वादीने गट नं.१०५७ ला लावलेल्या तिच्या नावाच्या नोंदीबाबत माहिती झाली ही गोष्ट न पटणारी आहे. त्यामुळे वादीने सदर नोंद २८५६ बेकायदेशीरपणे तिच्या नावावर करून घेतली असे प्रथमदर्शनी दिसुन येत नाही.

**१३.** वादीचे असे कथन आहे की, प्रतिवादींनी त्यांचे मयत पती अशोक शिवाजी देवरे व त्यांची पहिली पत्नी निर्मला अशोक देवरे यांचे वारस याबाबत दिवाणी चौकशी अर्ज नं.६/२५ दाखल केला होता व त्यामध्ये वादी ही मयत असल्याचे भासवुन कोर्टाची फसवणुक करून दि. २३.०६.२०२५

रोजी कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळवलेले आहे. वादीने अभिलेखावर निशाणी ३/९ सोबत सदर अर्जाच्या आदेशाची प्रत दाखल केलेली आहे. त्याचे अवलोकन केले असता त्यामध्ये प्रतिवादींनी अशोक देवरे व वादी हे मयत असल्याचे भासवुन न्यायालयापासून आदेश प्राप्त करून घेतलेला आहे. त्यामुळे वर नमुद केल्याप्रमाणे वादी हिचे कै.अशोक देवरे यांच्यासोबत प्रथमदर्शनी लग्न झाल्याचे दिसून येत असतांना प्रतिवादींनी सदरचा अर्ज बेकायदेशीरपणे दाखल करून त्यामध्ये न्यायालयास फसवुन बेकायदेशीररित्या वारस प्रमाणपत्र मिळविल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते. प्रतिवादींच्या कथनाप्रमाणे वादीने सदर वारस प्रमाणपत्रास आजपर्यंत आव्हानीत केलेले नसुन त्याबाबत कधीही आक्षेप घेतलेला नाही. याठिकाणी हे नमुद करणे गरजेचे आहे की, वादीच्या कथनानुसार तिला दि. २९.०७.२०२५ रोजी सदर वारस प्रमाणपत्राबाबत माहिती झालेली असतांना तिने लगेचच प्रस्तुतचा दिवाणी दावा दाखल करून त्यामध्ये सदर वारस प्रमाणपत्र बेकायदेशीर असल्याबाबत कथन केले असुन हरकत घ ेतल्याचे दिसुन येते. त्यामुळे वादीने सदर वारस प्रमाणपत्राला हरकत घेतली नाही असे याठिकाणी म्हणता येणार नाही.

**१४.** वादीच्या कथनानुसार तिने दावा मिळकतीमध्ये विहीर व बोरवेलच्या पाण्याची सुविधा करून सदर मिळकत बागायती केलेली असुन त्यामध्ये तिने ३ खोलींचे घर बांधलेले आहे. तिने पुढे असे कथन केलेले आहे की, त्यामध्ये ती तिच्या नावावर असलेल्या घराचे लाईटबिल वेळोवेळी भरत आहे. तिने तिच्या कथनांच्या पुष्ठयर्थ अभिलेखावर निशाणी ३/६ सोबत घराचे लाईटबिल दाखल केलेले आहे. त्याचे अवलोकन केले असता सदर लाईटबिल गट नं.१०५७ संबंधीत असल्याचे दिसुन येते. वादीने दि.२४.०२.२०२४ रोजी कृषी विभाग यांना दावा मिळकतीवर ठिबक सिंचन मिळणेकामी अर्ज दाखल केल्याची पोहोच पावती अभिलेखावर दाखल केलेली आहे. त्यामुळे वादी ही सदर दावा मिळकतीमध्ये घर बांधुन राहत असलेल्या तिच्या कथनांना पुष्टी मिळतांना दिसुन येते. याउलट, प्रतिवादींच्या असे कथन आहे की, कै. निर्मला देवरे यांचे निधन झाल्यानंतर सन २००७ पासुन कै. अशोक देवरे हे

त्यांच्याकडेच राहत होते व त्यांच्या सर्व पालनपोषण व इतर खर्च प्रतिवादी हे करीत होते. तेव्हापासुन कै. अशोक देवरे यांची वडिलोपार्जित **गट नं. १०५७** ही संपुर्ण मिळकत तेच कसत होते व आजरोजी ही सदर मिळकत त्यांच्या कब्जेवहीवाटीत होती. प्रतिवादींनी अभिलेखावर चेतन दयाराम देवरे व सागर सुनिल सोनवणे यांचे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. त्याचे अवलोकन केले असता त्यामध्ये त्यांनी प्रतिवादीस गट नं.१०५७ कसतांना पाहत असुन ती मिळकत कै. निर्मला देवरे यांचे निधन झाल्यापासुन त्यांचे कब्जे वहिवाटीत होती व आहे असे कथन केलेले आहे. परंतु याठिकाणी नमुद करणे गरजेचे आहे की, जर प्रतिवादी हे सदर गट नं.१०५७ कसत होते तर त्यांनी त्याबाबत तसा प्रथमदर्शनी पुरावा अभिलेखावर आणणे गरजेचे होते. केवळ चेतन दयाराम देवरे व सागर सुनिल सोनवणे यांनी दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रावरून सदर गट नंबर १०५७ हे प्रतिवादी कसत होते व ती त्यांच्या कब्जे वहिवाटीत होती असे याठिकाणी म्हणता येणार नाही.

**१५.** प्रतिवादींचे असे कथन आहे की, वादी हिच्या माहेरचे मुळ नाव मंदाकिनी जगन्नाथ पाचेरकर असुन तिचा विवाह बाळासाहेब शिंदे यांच्याशी झाला आहे. तशी तिच्या नावाची नोंद तिची आई हिच्या मृत्यूपश्चात गट नं. ६६३ च्या ७/१२ उता—यावर वारस नोंद नं.१५२१७ मध्ये व हक्कसोडच्या फेरफार नोंद नं. १५२८५ मध्ये झालेली आहे. याचाच अर्थ जोपर्यंत वादी हिचा विवाह संबंध बाळासाहेब शिंदे यांच्यासोबत अस्तित्वात होता. प्रतिवादींनी पुढे असे कथन केले आहे की, वादी हिचा विवाह दुसरी व्यक्ती भोरू भावनाथ यांच्यासोबत देखील झालेला असुन तिच्या आधार कार्ड व मतदान कार्डवरून सदर गोष्ट दिसुन येत असुन तो विवाह देखील आजरोजी अस्तित्वात आहे. प्रतिवादींनी त्यांच्या कथनांच्या पुष्ठयर्थ अभिलेखावर निशाणी १५ सोबत आधार कार्ड, पॅनकार्ड, गट नं.६६३ चा ७/१२ उतारा व फेरफार नोंदी दाखल केलेले आहेत. सदर फेरफार १५२१७ व १५२८५ चे अवलोकन केले असता त्यामध्ये मंदाकिनी बाळासाहेब शिंदे उर्फ निर्मलाबाई अशोक देवरे असे नाव

असल्याचे दिसुन येते. त्यानुसार वादीचे मंदाकिनी बाळासाहेब शिंदे उर्फ निर्मलाबाई अशोक देवरे या नावाची नोंद गट नं.६६३ च्या ७/१२ उता—याला झाल्याचे दिसुन येते. प्रतिवादींनी दाखल केलेल्या मतदान कार्डमध्ये वादीचा फोटो दिसुन येत असुन त्यावर तिचे नाव मंदा भौरू भावनाथ असे नमुद असल्याचे दिसुन येते. याठिकाणी हे नमुद करणे गरजचे आहे की, प्रतिवादींनी जरी असे कथन केलेले आहे की, वादीचा विवाह श्री.बाळासाहेब शिंदे व अन्य व्यक्ती भौरू भावनाथ यांच्यासोबत झालेला होता तर त्यांनी अशावेळी त्यांच्यासोबत विवाह झाल्याबाबतचा पुरावा अभिलेखावर दाखल करणे आवश्यक होते. परंतु तसा कोणताही पुरावा अभिलेखावर दाखल झालेला नाही. केवळ मतदान कार्ड व फेरफार क्रमांकाच्या नोंदीवरून वादीचा विवाह बाळासाहेब शिंदे व भौरू भावनाथ यांच्यासोबत झाला होता असे प्रथमदर्शनी याठिकाणी म्हणता येणार नाही.

**१६.** वादीचे असे कथन आहे की, प्रतिवादी व त्यांची मुले ही दावा मिळकतीमध्ये येवुन दावा मिळकतीस हरकत करीत असुन वादीने जमीन सोडुन तिच्या माहेरी निघुन जावे असे दमदाटी करीत आहेत. तसेच प्रतिवादी व त्यांची मुले ही बेकायदेशीररित्या कब्जा घेण्याच्या उद्‌देशाने बनाव देखील रचत असुन वेगवेगळया कार्यवाही करीत आहेत. याठिकाणी हे नमुद करणे गरजेचे आहे की, वर नमुद केल्याप्रमाणे प्रतिवादींनी कैलास अशोक देवरे व वादी हे मयत असल्याचे भासुन न्यायालयाकडून बेकायदेशीररित्या वारस प्रमाणपत्र घेतले असल्याने ते त्याचा वापर करून वादीला दावा मिळकतीमधुन कधीही बेदखल करू शकतात. तसेच ते बेकायदेशीर वारस प्रमाणपत्राच्या आधारे सदर दावा मिळकत त्रयस्थ इसमास विक्री अथवा तबदील करू शकतात. त्यामुळे अशा परिस्थितीत दावा मिळकतीचे रक्षण करणे गरजेचे आहे.

**१७.** वर नमुद केलेल्या चर्चेअंती असे दिसून येते की, वादीचा प्रस्तुत प्रकरणातील दावा मिळकतींमध्ये प्रथमदर्शनी हक्क व हितसंबंध आहे. वादीने तिची प्रथमदर्शनी केस शाबीत केलेली आहे. अनुकुलतेचा कल देखील हा वादीच्या बाजुने आहे. प्रस्तुत प्रकरणातील दावा मिळकतीमधुन प्रतिवादी यांनी

बेदखल केल्यास, विक्री अथवा इतर अन्य मार्गाने तबदील केल्यास वादीच्या हक्क व हितसंबंधावर गदा येणार आहे व तिचे कधीही न भरून येणारे असे नुकसान होणार आहे. सबब, प्रस्तुत प्रकरणात वादी ही तिच्या लाभात तुर्तातुर्त मनाई हुकूम मिळण्यास पात्र ठरलेली आहे. त्यामुळे या ठिकाणी प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जाचा खर्च त्यांना देणे उचित ठरणार आहे. त्यामुळे, प्रतिवादींना प्रस्तुतच्या तुर्तातुर्त ताकिद अर्जाचा खर्च देण्याचे आदेशीत करणे आवश्यक आहे. प्रस्तुतचा अर्ज व त्याचा कालावधी पाहता प्रतिवादींनी वादींना रक्कम रू. १,५००/— इतका खर्च प्रस्तुत अर्जाकामी देणे उचित राहील. प्रतिवादींनी प्रस्तुतच्या अर्जाचा खर्च स्वत: सोसणे आवश्यक आहे. सबब, मी खालील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. वादींचा अर्ज निशाणी क्र.५ मंजूर करण्यात येतो.

२. दावा कलम १ मध्ये नमुद केलेल्या दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी यांनी स्वत: अथवा त्यांच्यामार्फत इतर कोणीही वादीला त्यातुन बेदखल करू नये तसेच त्यावर त्रयस्थ इसमांचे हक्क, अधिकार, बोजे निर्माण होतील अथवा मिळकतीचा मालकी हक्क बदलेल असे कोणतेही कृत्य करू नये असा तुर्तातुर्त मनाई हुकुम त्यांच्याविरूध्द पारित करण्यात येतो.

३. दावा कलम १ मध्ये नमुद केलेल्या दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी यांनी स्वत: अथवा त्यांच्यामार्फत इतर कोणीही वादीच्या कब्जेभोगास हिल्लाहरकत होईल असे कृत्य करू नये असा तुर्तातुर्त मनाई हुकुम त्यांच्याविरूध्द पारित करण्यात येतो.

४. प्रतिवादींनी प्रस्तुतच्या अर्जाचा खर्च स्वत: सोसावा व वादीस रक्कम रू. १,५००/— इतका खर्च दयावा.

VISHWAJIT BIPINCHANDRA CHAVAN

Digitally signed by VISHWAJIT BIPINCHANDRA CHAVAN
Date: 2025.09.10 11:23:21 +0530

कळवण.
दिनांक :— ०९.०९.२०२५.

( **विश्वजीत बि. चव्हाण** )
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
कळवण